**ठळक बातम्या**

- महाराष्ट्रासह ४ राज्यांमधल्या ८ जिल्ह्यांना जोडणाऱ्या ३ रेल्वे प्रकल्पांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी, केरळ राज्याचं नाव केरलम् करायला मान्यता

- देशातल्या नागरिकांना सुदृढ ठेवण्यासाठी खासगी क्षेत्रानंही सहकार्य करावं, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन

- तेलंगणात देवुजीसह नक्षलवाद्यांच्या चार नेत्यांचं आत्मसमर्पण

- अफगाणिस्तानात पाकिस्ताननं केलेल्या हवाई हल्ल्यात १३ जण ठार

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये १ हजार ६९ अंकांची घसरण

**आणि**

- रणजी करंडकाच्या अंतिम सामन्यात प्रथम फलंदाजी करताना जम्मू काश्मीरच्या दिवसअखेर २ बाद २८४ धावा, शुभम पुंदीरचं नाबाद शतक

**<><><><><>**

नवी दिल्लीत नव्यानं उभारलेल्या सेवा तीर्थ संकुलात आज प्रथमच केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक झाली. २०४७ पर्यंत भारताला समृद्ध, सक्षम, आणि आत्मनिर्भर राष्ट्र बनवण्याच्या दृष्टीनं या वास्तूत घेतला जाणारा प्रत्येक निर्णय देशातल्या १४० कोटी जनतेच्या आशा आकांक्षांचं प्रतीक असेल, असा ठराव आजच्या बैठकीत एकमतानं मंजूर झाल्याचं, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी वार्ताहर परिषदेत सांगितलं. महाराष्ट्रासह ४ राज्यांमधल्या ८ जिल्ह्यांना जोडणाऱ्या ३ रेल्वे प्रकल्पांना आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी मिळाली. या प्रकल्पांवर ९ हजार ७२ कोटी रुपये खर्च होणार आहे. गोंदिया-जबलपूर रेल्वेमार्गाच्या दुपदरीकरणाचा त्यात समावेश आहे. श्रीनगर विमानतळाजवळ ७३ एकर भूखंडावर १ हजार ६७७ कोटी रुपये खर्चाचं सिविल एनक्लेव संकुल उभारायला, तसंच गुजरातमधे अहमदाबाद मेट्रोच्या विस्ताराला आज मंजुरी मिळाली.

पॉवरग्रिड या सरकारी वीजनिर्मिती कंपनीला खुल्या बाजारातून निधी उभारण्यावरची मर्यादा आता ५ हजार कोटी ऐवजी वाढवून साडेसात हजार कोटी केली आहे. कच्च्या तागासाठीचा हमीभाव २७५ रुपयांनी वाढवून प्रतिक्विंटल ५ हजार ९२५ रुपये केला आहे.

केरळ राज्याचं नाव केरलम् असं करण्याच्या प्रस्तावाला मंत्रिमंडळानं मान्यता दिल्याचं अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं….

**होल्ड- बाईट - अश्विनी वैष्णव**

**<><><><><>**

देशातल्या नागरिकांचं आरोग्य ही सामूहिक जबाबदारी आहे. नागरिकांना सुदृढ ठेवण्यासाठी खासगी क्षेत्रानंही सहकार्य करावं, अशी गरज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केली. त्या आज मुंबईत लोकभवनात 'जीवरक्षण आणि तंदुरुस्त भारताची निर्मिती' या देशव्यापी मोहिमेचं उद्घाटन करताना बोलत होत्या. मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष न करण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

- **- होल्ड राष्ट्रपती बाइट - -**

देशाला मोठ्या प्रमाणात औषधं आणि उपकरणं आयात करावी लागत असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. हे अवलंबित्व कमी करण्यासाठी आरोग्य आणि उद्योग क्षेत्रानं योगदान द्यावं असं आवाहन त्यांनी केलं.

यावेळी राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

देशभरातल्या ७५ जिल्ह्यांमध्ये चालणाऱ्या या मोहिमेच्या अंतर्गत नागरिकांची विविध आरोग्य तपासणी केली जाणार आहे. तसंच नागरिकांमध्ये आरोग्याच्या विविध समस्यांविषयी जनजागृती केली जाणार असल्याचं रुग्णालयाचे अध्यक्ष ए. पी. हिंदुजा म्हणाले.

राष्ट्रपती उद्या शेगाव इथं केंद्रीय आयुष मंत्रालयानं आयोजित केलेल्या राष्ट्रीय आरोग्य मेळ्याला, तसंच नागपूरमध्ये आयोजित 'एकता आणि विश्वासातून महाराष्ट्राचं सुवर्णयुग' उपक्रमाच्या उद्घाटन समारंभालाही त्या उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर त्या झारखंडला जाणार आहेत.

**<><><><><>**

तेलंगणा राज्यात हैदराबाद इथं आज चार वरिष्ठ नक्षलवादी नेत्यांनी आत्मसमर्पण केलं. पोलिटब्युरो सदस्य तिप्पिरी तिरुपती देवुजी, केंद्रीय समितीचे सदस्य मल्ला राजी रेड्डी संग्राम, तेलंगणा राज्य समितीचे सचिव बडे चोक्का राव दामोदर आणि राज्य समितीचे सदस्य नुने नरसिंहा रेड्डी गंगन्ना यांनी पोलीस महासंचालक बी. शिवधर रेड्डी यांच्या समक्ष आत्मसमर्पण केलं. प्रत्येक नेत्याला २५ लाख रुपयांचा धनादेश दिला असून त्यांना सुरक्षा आणि पुनर्वसनाची हमी दिली आहे. या आत्मसमर्पणामुळे माओवादी पक्षाची तेलंगणा राज्य समिती पूर्णपणे निष्क्रिय झाली आहे. राज्यातील ५९१ माओवादी कार्यकर्त्यांपैकी फक्त ११ जण शिल्लक असून बाकी सर्वांनी आत्मसमर्पण केलं आहे, असं रेड्डी यांनी सांगितलं.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून दोन दिवस इस्त्रायलच्या दौऱ्यावर जाणार आहेत. ते दुसऱ्यांदा इस्त्रायलच्या दौऱ्यावर जाणार असून ते इस्त्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतान्याहू यांची भेट घेणार आहेत. भारत -इस्त्रायल धोरणात्मक भागीदारीचा आढावा यावेळी घेतला जाईल. विज्ञान आणि तंत्रज्ञान, नवोन्मेष, संरक्षण आणि सुरक्षा, कृषी, जलव्यवस्थापन, व्यापार आणि अर्थव्यवस्था अशा अनेक क्षेत्रांतल्या विविध संधींविषयी हे दोन नेते चर्चा करणार आहेत. इस्त्रायलचे राष्ट्राध्यक्ष इसाक हरझोग यांनाही मोदी भेटणार असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत ११ हजार ९५५ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. महसुली तूट भरून काढण्यासाठी पुरवणी मागण्या कमी ठेवल्या आहेत. कृषी पंप आणि यंत्रमागावरल्या अनुदानासाठी ३ हजार ११२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी ८०३ कोटी प्रस्तावित आहेत. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये राज्यावर ९ कोटी ३२ लाख रुपये कर्जाचा बोजा वाढण्याचा अंदाज यात वर्तवला आहे.

<><><><><>

अफगाणिस्तानमध्ये नांगरहार आणि पक्तिका प्रांतातल्या जिल्ह्यांवर पाकिस्ताननं केलेल्या हवाई हल्ल्यात १३ जण ठार झाले तर ७ जण जखमी झाले. संयुक्त राष्ट्रांच्या अफगाणिस्तानातल्या सहाय्यक मोहिमेने २१ आणि २२ फेब्रुवारीच्या मध्यरात्री हे हल्ले

झाल्याचं म्हटलं आहे. निवासी भागात हे हल्ले करण्यात आल्याचं अफगाणिस्तानच्या संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे निर्माण झालेल्या धास्तीचे पडसाद आजही भारतीय शेअर बाजारांमध्ये उमटले. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर १ हजार ६९ अंकांची घसरण झाली आणि तो ८२ हजार २२६ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी २८८ अंकांनी घसरून २५ हजार ४२५ अंकांवर बंद झाला.

परकीय चलन बाजारात आज भारतीय रुपया अमेरिकन डॉलरच्या तुलनेने ७ पैशांनी घसरून ९० रुपये आणि ९५ पैशांवर बंद झाला.

<><><><><>

**रणजी करंडक** क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी कर्नाटक आणि जम्मू काश्मीर यांच्यात अंतिम सामना आज कर्नाटकात हुबळी इथं सुरु झाला. प्रथमच अंतिम फेरीत पोहोचलेल्या जम्मू-काश्मीरनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला, आणि आज दिवसअखेरपर्यंत २ बाद २८४ धावा केल्या. शुभम पुंदीरनं नाबाद शतक केलं. आजचा खेळ थांबला तेव्हा तो ११७, तर अब्दुल समद ५२ धावांवर खेळत होता.

**टी-ट्वेंटी क्रिकेट** विश्वचषक स्पर्धेत सुपर एट गटात आज श्रीलंकेत पल्लिकल इथं इंग्लंड आणि पाकिस्तान यांच्यात सामना होत आहे. पाकिस्ताननं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा पाकिस्तानच्या १६ व्या षटकात ४ बाद १२२ धावा झाल्या होत्या.

**महिला क्रिकेट**मधे भारत-ऑस्ट्रेलिया एकदिवसीय मालिकेत आज ऑस्ट्रेलियात ब्रिस्बेन इथं झालेल्या पहिल्या सामन्यात भारताला पराभव पत्करावा लागला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारताचा डाव ४९ व्या षटकात २१४ धावांवर संपला. ऑस्ट्रेलियानं ही धावसंख्या ४ गडी गमावून ३९ व्या षटकातच पार केली.

<><><><><>

देशभरातल्या ४० वर्षांवरील कामगारांसाठी कर्मचारी राज्य विमा महामंडळाच्या वार्षिक आरोग्य तपासणी शिबिरांचा प्रारंभ आज कामगार आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांनी केला. या कार्यक्रमात राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाची आरोग्य योजना आणि कर्मचारी

राज्य विमा महामंडळ यांच्यात आयुष्यमान भारत- प्रधानमंत्री जनआरोग्य योजना यांच्या एकत्रीकरणासाठी सामंजस्य करार करण्यात आला.

**//<><><><><>//**